वर्ष- १० | अंक- ३६ | मुंबई, मंगळवार, २३ जुलै ते २९ जुलै २०२४ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

PG 2 — २ वर्षांपासून फरार खुनाच्या प्रयत्नातील गुन्हेगारास पोलिसांनी केली अटक

3 → आपलं सर्वोच्च न्यायालय आता झालं पंच्याहत्तर वर्षांचं

तेल लावताना केस का गळतात? ← 4

# मुख्यमंत्र्यांकडून गडचिरोली पोलिसांच्या कार्याचे विशेष कौतुक



गडचिरोली : मुख्यमंत्री महोदयांनी आज गडचिरोली पोलिसांच्या अत्यंत यशस्वी कारवाईबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे. छत्तीसगड सीमेजवळील वांडोली गावात पोलीस आणि माओवाद्यांमध्ये झालेल्या तीव्र चकमकीत १२ माओवादी ठार झाले असून, महत्त्वाची स्वयंचलित शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.

पोलिसांकडून परिसरात सखोल तपास सुरू असून उर्वरित मृतांची ओळख पटवण्याचे काम युद्धपातळीवर चालू आहे. या कारवाईत सी ६०चे एक पोलीस उपनिरीक्षक आणि एक जवान जखमी झाले असून, त्यांना तत्काळ उपचारांसाठी नागपूरला हलवण्यात आले आहे. दोघेही धोक्याबाहेर असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले.



## मुख्यमंत्र्यांनी व्यक्तिशः फोन करून केले अभिनंदन :

मुख्यमंत्री महोदयांनी या यशस्वी कारवाईनंतर गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक, पोलीस उपमहानिरीक्षक (गडचिरोली परिक्षेत्र), पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना व्यक्तिशः फोन करून त्यांचे हार्दिक अभिनंदन केले. त्यांनी सर्व सहभागी जवानांच्या शौर्याचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या. उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांनी या कारवाईत सहभागी असलेल्या जवानांना ५१ लाख रुपयांचे विशेष बक्षीस जाहीर केले आहे.

## भविष्याचा दृष्टिकोन

मुख्यमंत्र्यांनी या यशस्वी कारवाईचे महत्त्व अधोरेखित करताना म्हटले, ''ही कारवाई गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवादी हालचालींवर निर्णायक आघात ठरेल. आमचे धोरण स्पष्ट आहे- विकासाला प्राधान्य देणे आणि हिंसाचाराला ठाम विरोध करणे. येत्या काळात गडचिरोली जिल्हा संपूर्णपणे नक्षलमुक्त करण्याचा आमचा निर्धार आहे.'' पोलीस दलाच्या या अतुलनीय कामगिरीमुळे परिसरातील सुरक्षा व्यवस्था अधिक बळकट होणार असून, स्थानिक नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना वाढणार आहे.

## प्रमुख घटनाक्रम

- १७ जुलै रोजी सकाळी १० वाजता उपविभागीय पोलीस अधिकारी (ऑपरेशन्स) यांच्या नेतृत्वाखाली ७ सी ६० पथकांनी विशेष ऑपरेशन सुरू केले.
- विश्वासार्ह माहितीच्या आधारे १२-१५ नक्षलवादी वांडोली गावाजवळ तळ ठोकून असल्याचे समजले होते.
- दुपारी सुरू झालेला जोरदार गोळीबार सुमारे ६ तासांहून अधिक काळ अधूनमधून चालू राहिला.
- या कारवाईत १२ माओवाद्यांचे मृतदेह आढळले आहेत.
- जप्त शस्त्रसाठ्यात ३ एके४७, २ आयएनएसएएस, १ कार्बाईन आणि १ एसएलआर, ७ स्वयंचलित शस्त्रांचा समावेश आहे.
- मृत माओवाद्यांपैकी एकाची ओळख टिपागड दलमचे प्रभारी डीव्हीसीएम लक्ष्मण आत्राम ऊर्फ विशाल आत्राम म्हणून पटली आहे.

# सोने व्यापाऱ्याची लाखो रुपयांची फसवणूक करणारा गजाआड

**मुंबई** : कराची रक्कम वगळून सोने देण्याचे आमिष दाखवून कर्नाटकमधील सोने व्यापाऱ्याकडून ६६ लाख ७९ हजार रुपये घेत त्यांची फसवणूक करणाऱ्या अँश्वर्ड विल्सन याला लोकमान्य टिळक मार्ग पोलिसांनी पुण्यातून अटक केली आहे. कर्नाटक, उडपी येथील रहिवासी असलेल्या सोने व्यापारी आर. प्रदीप कुमार यांच्या चंदिगढमधील कॉलेज मित्र उज्ज्वल डुगल याने त्याच्या ओळखीच्या एका व्यक्तीच्या माध्यमातून टॅक्स न देता सोने देण्याचे आमिष दाखवले. डुगल याने आर. प्रदीप कुमार याला झवेरी बझार येथील दलाल अँश्वर्ड विल्सन याचा मोबाईल नंबर देत त्याच्याशी संपर्क साधण्यास सांगितले. अँश्वर्ड विल्सन याने ६७ लाख रुपयांमध्ये १ किलो २०० ग्रॅम सोने देतो, असे सांगून आर. प्रदिप कुमार याला झवेरी बाझार येथे बोलावले. अँश्वर्ड विल्सन याने आर. प्रदिप कुमार याच्याकडून ६६ लाख ७९ हजार ६०० घेत पोलीस पाठलाग करत असल्याची बतावणी करून पळ काढला.

# हुंड्यासाठी गरोदर महिलेची हत्या

नालासोपारा - हुंड्यासाठी महिला व तिच्या पोटातील बाळास औषध देऊन ठार मारणारे नवरा व सावत्र मुलास ताब्यात घेण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.



अधिक माहितीनुसार मयत महिलेचा पती आरोपी जयप्रकाश अमरनाथ दुबे व सावत्र मुलगा सचिन जयप्रकाश दुबे हे असून, आरोपी जयप्रकाश अमरनाथ दुबे याने फिर्यादीसोबत लग्न झाल्यानंतर तिच्या घरच्यांनी लग्नामध्ये काही दिले नाही. या कारणावरून दारू पिऊन दररोज मारहाण करीत होता. दिनांक ०७/०४/२०२४ रोजी रात्री ८.०० च्या दरम्यान आरोपी जयप्रकाश अमरनाथ दुबे याने दारू पिऊन फिर्यादी ही आठ महिन्याची गरोदर असतानासुद्धा तिला मारहाण केली व आरोपी सचिन दुबे याने फिर्यादीला पकडून ठेवून जयप्रकाश अमरनाथ दुबे याने कोणते तरी औषध पिण्याकरिता दिल्याने फिर्यादीचे पोटातील बाळ पोटामध्येच मयत झाल्याने दिनांक २०/०४/२०२४ रोजी आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. सदर गुन्ह्यात पती जयप्रकाश अमरनाथ दुबे यास स्थानिक पोलिसांनी अटक करून मा. न्यायालयात हजर केले असता न्यायालयाच्या आदेशाने जामिनावर मुक्त होता. परंतु आरोपी सचिन जयप्रकाश दुबे हा स्थानिक पोलिसांना मिळून येत नव्हता.

फिर्यादी ही स्टार हॉस्पिटल, नालासोपारा पश्चिम येथे उपचार घेत असताना दिनांक ०२/०७/२०२४ रोजी मयत झाल्याने सदर गुन्ह्यात कलम वाढवून आरोपी जयप्रकाश अमरनाथ दुबे याचा जामीन रद्द होणेकामी पोलिसांनी न्यायालयात अहवाल सादर केला असता दिनांक ११/०७/२०२४ रोजी जामीन रद्द करण्यात आलेला होता. तेव्हापासून दोन्ही आरोपी पळून गेल्याने पोलिसांना मिळून येत नव्हते. हुंड्यासाठी पत्नी व तिच्या पोटातील बाळाची हत्या यासारख्या गंभीर व संवेदनशील गुन्ह्यातील आरोपी मिळून येत नसल्याने मा. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्काळ आरोपीचा शोध घेण्याचे आदेश दिले होते.

## आरोपी नवरा व सावत्र मुलास अटक

त्या अनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पालीस निरीक्षक राहुल राख, यांनी १) पोउपनिरी. हितेंद्र विचारे, २) पोहवा. राजाराम काळे, ३) पोहवा. शिवाजी पाटील, ४) पोहवा. गोविंद केंद्रे, ५) पोहवा. हनुमंत सूर्यवंशी, ६) पोहवा. संग्राम गायकवाड, ७) पोहवा. संतोष मदने, ८) पोशि. अकिल सुतार, ९) पोशि. साकेत माघाडे, १०) पोशि. नितीन राठोड असे पथक तयार करून त्यांना तत्काळ आरोपीच्या शोधार्थ रवाना केले. नमूद पथकाने सदर सलग चार दिवस अहोरात्र मेहनत घेऊन तपासात सातत्य ठेवून तांत्रिक तपास व गोपनीय माहितीचे आधारे सापळा लावून आरोपी १) जयप्रकाश अमरनाथ दुबे, वय-४० वर्षे, रा.रुम क्र.पी/७०१, विना डायनास्टिक बिल्डिंग, एव्हरनाईन, नालासोपारा पूर्व, ता. वसई, जि. पालघर, २) सचिन जयप्रकाश दुबे, वय-२० वर्षे, यांना नालासोपारा येथून दिनांक १६/०७/२०२४ रोजी शिताफीने ताब्यात घेतले असून, त्यांचा नमूद गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना पुढील कारवाईकरिता आचोळे पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले आहे. सदरची कारवाई ही मा. पोलीस उपआयुक्त (गुन्हे) श्री. अविनाश अंबुरे व सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख, सपोनि. नितीन बेंद्रे, दत्तात्रय सरक, पोउपनिरी. हितेंद्र विचारे, सहा.पोउपनिरी. श्रीमंत जेधे, पोहवा. राजाराम काळे, हनुमंत सूर्यवंशी, संतोष मदने, संग्राम गायकवाड, शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, सतीश जगताप, मनोहर तावरे, आसिफ मुल्ला, राजवीर संधू, प्रवीणराज पवार, महेश वेल्हे, अनिल नागरे, पोशि. अखिल सुतार, नितीन राठोड, साकेत माघाडे, अंगद मुळे, मसुब सचिन चौधरी, सफौ. संतोष चव्हाण, सर्व नेमणूक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केलेली आहे.

# आश्रय सामाजिक शैक्षणिक ट्रस्ट तर्फे 'एक झाड आईसाठी' मोहीम उत्साहात

**आश्रय सामाजिक शैक्षणिक ट्रस्ट, ठाणेतर्फे गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिन्नर नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम संपन्न**

नाशिक : मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक संस्थेच्या गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य विज्ञान महाविद्यालय सिन्नर नाशिक व आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्ट ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'एक झाड आईसाठी' या वृक्षारोपण मोहिमेची सुरुवात झाली. महाविद्यालयाचा परिसर अजून हिरवागार करण्यासाठी २०० वृक्षांची लागवड करण्यात येत आहे. मंगळवार दिनांक १६ जुलै २०२४ रोजी परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.



वृक्षारोपण करताना प्रोफेसर प्रकाश पांगम, प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ, उपप्राचार्य प्रा. राजेंद्र पवार



वृक्षारोपण करताना डॉ. मनीष ठक्कर, डॉ. कुसुम कुंटे, प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ, उपप्राचार्य प्रा. राजेंद्र पवार, प्रा. दीपाली सूर्यवंशी.



आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्ट ठाणे यांचे संस्थापक डॉ. दीपक मोरेश्वर नाईक यांनी महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यासाठी स्थानिक प्रजातींचे वृक्ष वड, पिंपळ, चिंच, जांभूळ, कडुनिंब यासारख्या ५० वृक्षांची लागवड करण्यासाठी ७००० रुपयांची मदत केली. आपल्या धरणीमातेच्या मातृभूमी ऋणातून मुक्त होण्यासाठी आपल्या आईसाठी एक वृक्ष लागवड व संवर्धन ही मोहीम महत्त्वाची ठरणार आहे.

वृक्ष संवर्धन ही काळाची गरज आहे. वृक्ष संवर्धनातून माती, पाणी, प्राणी, पशुपक्ष्यांचेही संवर्धन होते. भविष्यातील तापमानवाढ कमी करण्यासाठी व मानवी जीवन आनंदी, आरोग्यदायी ठेवण्यासाठी प्रत्येकाने किमान एका वृक्षाची लागवड करून त्याची जपणूक केली पाहिजे, असे मत मा. संचालक श्री कृष्णाजी भगत यांनी व्यक्त केले. पर्यावरणाची काळजी घेण्यासाठी युवकांनी पुढे येऊन आपली मातृभूमीच्या संरक्षणासाठी वृक्ष लागवड व जतन करण्याची सामाजिक जबाबदारी निभवावी. आपल्या घरासमोर, अंगणात, शेताच्या बांधावर, माळरान, सोसायटीच्या प्रांगणामध्ये, शाळा, महाविद्यालय, शासकीय जागेवर वृक्षांची लागवड करावी. वृक्ष आपल्याला मातेसारखे शितल छाया, फळे, फुले देऊन आपले जीवन आनंदी करतात. म्हणून प्रत्येकाने आपल्या आईसाठी एक झाड लावून पृथ्वीच्या पर्यावरण संवर्धनासाठी एक पाऊल उचलावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ सर यांनी केले. महाविद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळा हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या दिंडी सोहळ्यात विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेषात महाराष्ट्राच्या वारकरी-संत परंपरेचे रिंग सोहळा, अभंग गायन हा कार्यक्रम सादर केला. याप्रसंगी आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्ट ठाणे यांचे नाशिक विभागातील प्रोफेसर प्रकाश पांगम, डॉ. मनीष ठक्कर, जनरल मेडिसीन, डॉ. कुसुम कुंटे, एमडी स्त्रीरोग तज्ज्ञ हे याप्रसंगी उपस्थित होते. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सिन्नर तालुक्याचे संचालक श्री. कृष्णाजी भगत साहेब उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. पी. व्ही. रसाळ, उपप्राचार्य प्रा. आर. व्ही. पवार, प्रा. दीपाली सूर्यवंशी, एनसीसी प्रमुख लेफ्टनंट संदीप बाळासाहेब भिसे, विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी आर. एम. अंबेकर, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. ललित कळस्कर, प्रा. आर. टी. सोनवणे, रोवर रेंजर अधिकारी दीपक खुरचे, सांस्कृतिक कलामंच प्रमुख प्रा. जावेद शेख, प्रा. भारस्कर, हो. प्रा. बी. यू. पवार हे प्रसंगी उपस्थित राहिले.

राष्ट्रीय छात्र सेना (NCC ARMY WING) प्रथम वर्ष भरती प्रक्रि या. निवडपूर्व जास्तीत सहभागी होत असलेल्या छात्र. आश्रय ट्रस्टच्या वतीने प्रोफेसर प्रकाश पांगम, डॉ. मनीष ठक्कर, जनरल मेडिसीन, डॉ. कुसुम कुंटे यांनी ॲनिमिया, थॅलेसेमिया याविषयीची जाणीव जागृती निर्माण करून त्यांच्याशी हितगुज साधले. डॉ. कुसुम कुंटे यांनी राष्ट्रीय छात्र सेनेत भरती होण्यासाठी आलेल्या विद्यार्थिनींना आपल्या आहारात कोणते घटक महत्त्वाची आहेत?. महिलांचे प्रश्न व आरोग्याविषयी जागृती करत विद्यार्थिनींच्या प्रश्नांना उत्तरे देऊन त्यांच्या मनातील शंका दूर केल्या. आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्ट, ठाणे व सिन्नर महाविद्यालय वर्षभरात आरोग्य शिबिरे, रक्तदान, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक-सार्वजनिक समाजोपयोगी उपक्रम राबविणार आहे. यातून समाजातील विविध स्तरातून आलेल्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना याचा प्रत्यक्षपणे लाभ होणार आहे, असे महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ सर यांनी आपले मत व्यक्त केले. प्रा. आर. व्ही. पवार उपप्राचार्यांनी या कार्यक्रमाचेआभार व्यक्त केले.





महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी टाळ, पखवाज, भगवी ध्वज पताका घेऊन विठ्ठल नामाच्या गजरात पालखी व रिंगण सोहळा पटांगणात उत्साहात सादर केला. या सोहळ्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये वृक्षाची दिंडी काढण्यात आली. राष्ट्रीय छात्र सेना (NCC ARMY WING), राष्ट्रीय सेवा योजना (NSS) रोवर-रेंजर स्वयंसेवक विद्यार्थ्यांच्या मदतीने 'एक वृक्ष आईसाठी' या मोहिमेअंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले.





पालखी सोहळा वृक्षदिंडीत सहभागी प्रमुख अतिथी मा. श्री. कृष्णाजी भगतसाहेब, प्राचार्य पी. व्ही. रसाळ, उपप्राचार्य आर. व्ही. पवार, प्रोफेसर प्रकाश पांगम, डॉ. मनीष ठक्कर, डॉ. कुसुम कुंटे.





राष्ट्रीय छात्र सेना (NCC ARMY WING) प्रथम वर्ष भरती उपस्थित विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना डॉ. कुसुम कुंटे.

पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार, २३ जुलै ते २९ जुलै २०२४

# २ वर्षांपासून फरार खुनाच्या प्रयत्नातील गुन्हेगारास पोलिसांनी केली अटक

नालासोपारा - खुनाचा प्रयत्न करुन २ वर्षांपासून फरार झालेल्या आरोपीस मध्यवर्ती गुन्हे शाखेकडून अटक करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार आचोळे पोलीस स्टेशनमध्ये ०७/०७/२०२२ रोजी खुनाचा प्रयत्न करण्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यातील फिर्यादी आदर्श प्रशांत राय, वय-२२, रा. ओ/१०२, माऊली कृपा, सांखेश्वर नगर, आचोळे रोड, नालासोपारा पूर्व, ता. वसई, जि. पालघर हे दिनांक ०६/०७/२०२२ रोजी रात्री ११.३० च्या दरम्यान आपल्या मोटारसायकलमध्ये पेट्रोल भरण्याकरिता जात असताना नमूद गुन्ह्यातील आरोपी यांनी फिर्यादीचे मित्र इम्रान खान यांच्या घराजवळ बेकायदेशीर मंडळी जमा करून त्यांच्या दरवाजावर लाथा मारत असताना दिसले. म्हणून आदर्श प्रशांत राय याने त्यांना विचारले असता आरोपीने राय यांचा जीव घेण्याच्या उद्देशाने त्याच्या हातातील धारदार हत्याराने डोक्यात मारून गंभीर जखमी केले होते.



मा. पोलीस उपायुक्त, (गुन्हे) यांनी आयुक्तालयाच्या अभिलेखावरील शरीराविरुद्ध, मालमत्तेविरुद्ध गंभीर गुन्हे तात्काळ उघडकीस आणणेबाबत सूचना दिल्या असल्याने प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. राहुल राख यांनी त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदार यांना वरिष्ठांचे आदेशाप्रमाणे सूचना दिल्या होत्या. सदर गुन्ह्यातील आरोपी आफताब फारुक खान, वय-२१, हा गेले २ वर्षांपासून पोलिसांना मिळून येत नव्हता. तसेच तो वारंवार गंभीर गुन्हे करत होता. नमूद आरोपीची परिसरात दहशत असल्याने त्याचा ठावठिकाण्यबाबत माहिती देण्यास कोणीही पुढे येण्याचे धाडस करीत नव्हते. त्यामुळे आरोपी पोलिसांच्या हाती लागत नव्हता.

मध्यवर्ती गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी पोउपनि. विचारे व अंमलदार पोहवा राजाराम काळे, संतोष मदने, अकिल सुतार यांनी वरील गुन्ह्याचा बारकाईने अभ्यास करून आरोपीबाबत सखोल तपास करून बातमीदारामार्फत माहिती मिळवून आरोपी आफताब फारुक खान, रा. रुम २०४, सुंदर अपार्टमेंट, सांकेश्वर नगर, नालासोपारा पूर्व, ता. वसई, जि. पालघर यास नालासोपारा येथून दिनांक १८/०७/२०२४ रोजी ताब्यात घेतले. त्याच्याकडे पोलिसांनी अधिक तपास केला असता सदर गुन्ह्याव्यतिरिक्त १) आचोळे पोलीस स्टेशनमध्ये असे एकूण ३ गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), व श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो. नि. राहुल राख, सहा.पो. निरी/नितीन बेंद्रे, दत्तात्रय सरक, पोउपनिरी/हितेंद्र विचारे, सहाफौज/श्रीमंत जेधे, पोहवा/मनोहर तावरे, राजाराम काळे, संतोष मदने, अकिल सुतार, शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, संग्राम गायकवाड, हनुमंत सूर्यवंशी, राजवीर संधू, प्रवीण पवार, अनिल नागरे, महेश वेल्हे, सतीश जगाताप पोअं/अंगद मुळे, नितीन रोड, साकेत माघाडे, एमएसएफ/सचिन चौधरी यांनी केली आहे.

# तळोजा कारागृहावर तिसरा डोळा ठेवणार करडी नजर; अद्ययावत सीसीटीव्ही यंत्रणेचे उद्‌घाटन

**नवी मुंबई** : कारागृहातील गैरप्रकार, कैद्यांची हाणामारी रोखण्यासाठी तळोजा मध्यवर्ती कारागृहात ४५१ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येत असून, त्यापैकी ३३१ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची अद्ययावत अशी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. या सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणचे उद्‌घाटन सोमवारी अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्याचे अमिताभ गुप्ता यांच्या हस्ते करण्यात आले.



कारागृहातील कैद्यांची हाणामारी, तसेच गैरप्रकार रोखण्यासाठी पहिल्या टप्प्यात तळोजा मध्यवर्ती कारागृहामध्ये ३३१ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची अद्ययावत यंत्रणा सुरू करण्यात आली आहे. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात उर्वरित सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे कारागृहातील घडामोडींवर आणि कैद्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येणार आहे. अत्याधुनिक असलेल्या या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये एआय टेक्नॉलजीचादेखील वापर करण्यात आला आहे. कारागृहातील गैरप्रकार रोखणे, तसेच बंदिस्त असलेल्या कैद्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे उपयुक्त ठरणार असल्याचे यावेळी अमिताभ गुप्ता यांनी सांगितले.

कैद्यांना त्यांच्या नातेवाईकांना व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे संपर्क साधण्यासाठी तळोजा कारागृहाला नवीन १५ व्हिडीओ कॉन्फरन्सिंग यंत्रणा प्राप्त झाल्या असून, सदरची यंत्रणा बसविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच कारागृह सुरक्षेसाठी बॉडी स्कॅनर मशीनदेखील या कारागृहास उपलब्ध करून देण्यात आले असून, या सुविधेचा वापर कैद्यांची झडती घेण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. प्रशासनाच्या या सुविधेमुळे कारागृहात होणाऱ्या हालचाली टिपता येणार आहेत.

# बँक फसवणूकप्रकरणी पुरुषोत्तम मंधाना यांना ईडीकडून अटक

**मुंबई** : बँक ऑफ बडोदाच्या नेतृत्वाखालील बँक समूहाची तब्बल ९७५ कोटी रुपयांची फसवणूक केल्याच्या प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मंधाना इंडस्ट्रीजचे माजी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पुरुषोत्तम मंधाना यांना गुरुवारी अटक केली. विशेष पीएमएलए न्यायालयाने त्यांना सहा दिवसांची ईडी कोठडी सुनावली आहे.

केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) बँक ऑफ बडोदाच्या नेतृत्वाखालील बँक समूहाची तब्बल ९७५ कोटी रुपयांची फसवणूक केल्याच्या आरोपांखाली मंधाना इंडस्ट्रीजसह पुरुषोत्तम मंधाना, मनीष मंधाना, बिहारीलाल मंधाना आणि इतरांविरुद्ध दाखल केलेल्या गुन्ह्याच्या आधारे मनी लाँडरिंग कायद्यान्वये गुन्हा दाखल करून ईडी तपास करत आहे. बँक समूहाची फसवणूक करून मिळालेली रक्कम इतरत्र वळवण्यात आल्याच्या आरोपांवरून ईडीने तपास करत २७ जून व ५ जुलैला याप्रकरणाशी संबंधित मुंबईतील १२ ठिकाणी छापेमारी केली.

# लग्नाचे आमिष दाखवून शारीरिक संबंध ठेवणाऱ्याविरोधात गुन्हा

**मुंबई** : उत्तर प्रदेशमधून कामाच्या शोधत मुंबईत आलेल्या तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून एका विवाहित व्यक्तीने तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करून भांडुप पोलीस अधिक तपास करीत आहेत. मूळची उत्तर प्रदेशमधील रहिवासी असलेली ३० वर्षीय तक्रारदार तरुणी कामानिमित्त मुंबईत आली असून, ती भावासोबत भांडुप पश्चिम परिसरात राहते. याच परिसरात राहणाऱ्या राकेश वर्मा नावाच्या व्यक्तीशी तिची २०१७ मध्ये ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले. राकेश वर्माने तिला लग्नाची मागणी घालून तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. तरुणीला राकेशचा विवाह झाला असून त्याला एक मुलगा असल्याचे समजले. तरुणीने त्याला विचारणा केली असता त्याने पत्नीसोबत पटत नसून तिचे बाहेर अनैतिक संबंध असल्याचे सांगितले. तसेच, त्याने तरुणीला लग्न करून आयुष्यभर सांभाळण्याचे आश्वासन दिले. तरुणी एक वर्ष त्याच्या घरी पत्नी सारखी राहिली. तरुणीकडून वारंवार विवाहाबाबत विचारणा होत असल्याने राकेशने १७ मे २०२२ रोजी वांद्रे येथील कौटुंबिक न्यायालयात विवाहासाठी नोंदणी केली. पण, त्यानंतर मात्र त्याने दोघांच्या वयात २४ वर्षांचे अंतर असल्याचे सांगून विवाह करणे टाळले. आयुष्यभर सांभाळण्याचे आश्वासन देऊन तो तरुणीचा सर्व खर्च उचलत होता. मात्र गेल्या काही दिवसांपासून राकेशने तिला खर्चासाठी पैसे देणे आणि तिच्याकडे येणे बंद केले. ८ जुलैला तरुणी राकेशच्या घरी गेली असता त्याने आणि त्याच्या पत्नीने तिला शिवीगाळ करून मारहाण केली. अखेर, तिने भांडुप पोलीस ठाणे गाठून राकेश विरोधात तक्रार दिली आहे.

# आधारकार्डचा दुरुपयोग करणारी टोळी अखेर गजाआड

**भिवंडी** : शासकीय योजनेतून घर मिळवून देतो, असे सांगून गरजू लोकांचे आधारकार्ड घेऊन त्यात फेरफार करून त्याचा वापर नवीन गाड्या खरेदी करून कमी किंमतीत विक्री करणाऱ्या टोळीला नारपोली पोलिसांनी जेरबंद केले आहे. याप्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून चारजणांना नवीन दुचाकीसह अटक केली आहे. याबाबत नारपोली पोलीस ठाण्यात मागील आठवड्यात तक्रार आली होती.

त्यानुसार मालेगाव येथे राहणारा तारीक अन्वर मुश्ताक अहमद मोमीन(रा.भिवंडी) याने 'पंतप्रधान आवास योजना अंतर्गत

## नवीन गाड्या खरेदी करून कमी किमतीत विक्री



गरीब व गरजू लोकांना घरे मिळणार आहेत. त्यामधील एक घर मिळवुन देईल' असे सांगून त्याने आणलेल्या फॉर्मवर तक्रारदारांच्या सह्या घेतल्या. आधारकार्ड, पॅनकार्ड व रोख ४० हजार रुपये रक्कम घेऊन घर मिळवून न देता फसवणूक केली होती. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. त्यानुसार तारिकचा भिवंडीतील जैतुनपूरा येथील साथीदार शैन उर्फ जुल्फीकार जमालुदफदीन मोमीन (३२) व तालुक्यातील कोनगाव येथे राहणारा मुन्तकीम मतीन शेख(२९) यांनी मिळून भिवंडी शहर आणि परिसरातुन अनेक जणांना पंतप्रधान आवास योजनेतून घरे मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

पॅन कार्ड व आधार कार्ड मिळवले.तसेच त्यांच्या विविध फॉर्मवर सह्या घेतल्या. त्याव्दारे विविध फायनान्स कंपनीचे लोन घेऊन सुमारे २० दुचाकी वाहने मिळवून ती अर्ध्या किंमतीत भिवंडी, धुळे, मालेगाव व नंदुरबार परिसरात विक्री केल्या आहेत. तसेच आरोपींनी जमा केलेल्या आधार कार्डवरील पत्ता बदलण्यासाठी गैबीनगर येथील नाविद गुलाम अहमद खान(३२) याने मदत केली.

टोळीने शासनाचे घर घेण्यासाठी गरजू लोकांकडून घेतलेल्या आधारकार्डासह पैशाचा दुरुपयोग करून एकूण २० दुचाकी खरेदी केल्या. त्यापैकी आरोपींची विक्री केलेल्या विविध कंपण्याच्या १० लाख ४५ हजार रुपये किमतीच्या १० गाड्या पोलिसांनी जप्त केल्या आहेत.

# शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली डॉक्टरला लाखोंचा गंडा

**नवी मुंबई** : शेअर मार्केटमध्ये ऑनलाइन गुंतवणुकीवर चांगला नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून सायबर टोळीने खांदा कॉलनीत राहणाऱ्या एका डॉक्टरकडून तब्बल ८४ लाख रुपये तसेच खारघर भागातील व्यक्तीकडून ५१ लाख रुपये उकळून या दोघांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. नवी मुंबई सायबर पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात सायबर टोळी विरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेला ३५ वर्षीय डॉक्टर खांदा कॉलनीमध्ये राहण्यास असून, गेल्या मे महिन्यात त्याला इन्स्टाग्रामवर शेअर मार्केट गुंतवणुकीसंदर्भातील व्हिडीओ निदर्शनास आले होते. या व्हिडीओला डॉक्टरने लाईक केल्याने सायबर चोरट्यांनी या डॉक्टरला व्हॉट्सॲपद्वारे संपर्क साधून शेअर मार्केटमधील गुंतवणूकसंदर्भात विचारणा केली होती. त्या वेळी डॉक्टरने शेअर मार्केट संदर्भातील माहिती हवी असल्याचे सांगितले होते. त्यानंतर सायबर टोळीने डॉक्टरला एका व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये जोडून घेऊन त्याला शेअर मार्केटमधील गुंतवणुकीसंदर्भात माहिती देण्यास सुरुवात केली.

त्यानंतर डॉक्टरने शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्याची तयारी दर्शवल्यानंतर सायबर टोळीने त्यांना ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. तसेच त्यांचे अकाऊंट सुरू केल्याचे भासवण्यात आले. त्यानंतर डॉक्टरने ५० हजार रुपये पाठवून गुंतवणुकीला सुरुवात केली. त्यानंतर डॉक्टरने भरलेले पैसे तसेच शेअर्स खरेदी केल्यानंतर झालेला फायदा डॉक्टरला ॲपवर दाखवण्यात येत होता. त्यानंतर डॉक्टरने सायबर चोरट्याच्या सुचनेनुसार वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये २० दिवसांमध्ये स्वतःच्या व पत्नीच्या खात्यातून तब्बल ८४ लाख १३ हजार रुपये भरले.

त्यामुळे डॉक्टरला तब्बल ३ कोटी २६ लाख रुपये फायदा झाल्याचे दाखवण्यात आले. त्यानंतर डॉक्टरने त्यातील काही पैसे काढून घेण्याचा प्रयत्न केला असता, डॉक्टरला पैसे काढता आले नाहीत. पैसे काढण्यासाठी त्यांना कर स्वरुपात काही रक्कम भरावी लागेल, असे सायबर टोळीकडून सांगण्यात आले. मात्र, डॉक्टरने त्याच्याकडे पैसे नसल्याचे सांगितल्यानंतर सायबर चोरट्यांनी त्याला टाळण्यास सुरुवात केली. त्यानंतर आपली फसवणूक होत असल्याचे डॉक्टरच्या लक्षात आल्यानंतर या डॉक्टरने सायबर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

# रेल्वे सुरक्षा दलातील उपनिरीक्षकाला ७० हजारांची लाच घेताना अटक

**मुंबई** : केंद्रीय अन्वेषण विभागाने मुंबईतील रेल्वे सुरक्षा दलाच्या (आरपीएफ) एका उपनिरीक्षकाला तक्रारदाराकडून ७० हजार रुपयांची लाच घेतल्याच्या आरोपाखाली अटक केली आहे. या तक्रारीच्या आधारे आरपीएफ पोलीस स्टेशन, उरण, नवी मुंबई येथे तैनात असलेल्या उपनिरीक्षकाविरुद्ध केंद्रीय अन्वेषण विभागाने गुन्हा दाखल केला आहे. रेल्वे न्यायालयात २० जुलै रोजी होणारी सुनावणी प्रलंबित असताना जप्त केलेला ट्रेलर सोडण्याच्या बदल्यात आरोपीने लाच मागितल्याचा आरोप तक्रारदाराने केला होता. तक्रारीनुसार, न्यायालयाने ट्रेलर सोडण्याचा आदेश दिला तरी लाच दिल्याशिवाय तो सोडला जाणार नाही, अशी आरोपीने तक्रारदाराला धमकी दिली होती. केंद्रीय अन्वेषण विभागाने सापळा रचून आरोपीला तक्रारदाराकडून ७० हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले. १६ जुलै रोजी आरोपीस अटक करण्यात आली आणि त्यानंतर आरोपीला सक्षम न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला १९ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तपासाचा एक भाग म्हणून केंद्रीय अन्वेषण विभागाने ठाणे जिल्ह्यातील, कल्याण येथील आरोपींच्या निवासस्थानाची झडती घेतली.

# अक्षता म्हात्रेच्या पती व सासूला अटक

**नवी मुंबई** : शिळफाटा येथील श्री गणेश घोळ मंदिरातील पुजाऱ्यांनी सामूहिक लैंगिक अत्याचार करून हत्या केलेल्या अक्षता म्हात्रे या विवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ करणाऱ्या तिच्या पतीला व सासूला गुरुवारी एनआरआय पोलिसांनी अटक केली. न्यायालयाने या दोघा मायलेकांची २० जुलैपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली आहे. या प्रकरणातील आरोपी नणंदेचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे.

बेलापूर येथे राहणाऱ्या अक्षता म्हात्रे हिचा तिच्या सासरकडील मंडळींकडून लग्न झाल्यापासून छळ करण्यात येत होता. सुरुवातीला अक्षताला मूलबाळ होत नसल्याच्या कारणावरून सासरकडील मंडळींनी तिचा मानसिक छळ सुरू केला होता. त्यानंतर अक्षताने माहेरुन १० लाख रुपये आणावेत, यासाठी तिचा छळ सुरू केला होता. त्या वेळी अक्षताच्या कुटुंबीयांनी कर्ज काढून अक्षताचा पती कुणाल म्हात्रे याला १० लाख रुपये दिले होते. मात्र, त्यानंतरदेखील त्यांनी अक्षताचा शारीरिक व मानसिक छळ सुरूच ठेवला होता.

सासरकडील मंडळींकडून होत असलेल्या त्रासाला कंटाळून अक्षता गत ६ जुलै रोजी सकाळी ६.३० वाजता घर सोडून निघून गेली होती. याबाबतची माहिती अक्षताच्या कुटुंबीयांना मिळाल्यानंतर त्यांनी अक्षताच्या मुलाला आपल्या घरी आणले होते. मात्र, त्याच दिवशी रात्री अक्षताचा पती कुणाल म्हात्रे, सासरा सुरेश म्हात्रे व नणंद दिपमाला सारंग कडू या तिघांनी अक्षताच्या आई-वडिलांच्या घरी जाऊन अक्षताच्या मुलाला जबरदस्तीने आपल्या सोबत घेऊन गेले होते.

अक्षताच्या सासरकडील मंडळींकडून अशा पद्धतीने अक्षताचा छळ करण्यात येत असल्यामुळेच अक्षता त्या दिवशी घर सोडून शिळफाटा येथील श्री गणेश घोळ मंदिरात गेली होती. ती एकटी असल्याची संधी साधून मंदिरातील पुजाऱ्यांनी तिच्यावर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याचा आरोप मृत अक्षताच्या कुटुंबीयांनी केला आहे. तसेच या सर्व प्रकाराला अक्षताच्या सासरकडील मंडळी जबाबदार असल्याची तक्रार एनआरआय पोलीस स्टेशनमध्ये केली होती. त्यानंतर पोलिसांनी दोन दिवसांपूर्वी अक्षताचा पती कुणाल म्हात्रे (३६), सासू मंदा म्हात्रे (५६) व नणंद दिपमाला सारंग कडू (४०) या तिघांविरोधात छळवणुकीसह अपहाराचा गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर एनआरआय पोलिसांनी गुरुवारी अक्षताचा पती कुणाल मात्रे व सासू मंदा मात्रे या दोघांना अटक केली. या दोघांना बेलापूर येथील न्यायालयात हजर करण्यात आले. या वेळी आगरी समाजातील वकिलांनी न्यायालयात अक्षताच्या कुटुंबीयांकडून बाजू मांडली, त्यानंतर न्यायालयाने अक्षताचा पती व सासू या दोघांना २० जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

## न्याय मिळवून देण्यासाठी वकिलांचा पुढाकार

बेलापूर येथील अक्षता म्हात्रे या विवाहितेच्या हत्येनंतर त्याचे पडसाद नवी मुंबईत सर्वत्र उमटत आहेत. अक्षताला न्याय मिळवून देण्यासाठी सामाजिक संघटनांसह राजकीय पक्ष पुढे सरसावले आहेत. त्याचप्रमाणे आगरी समाजातील वकीलदेखील आता अक्षता म्हात्रे हिला न्याय मिळवून देण्यासाठी एकवटले आहेत. न्यायालयात गुरुवारी आगरी समाजातील वकिलांनी अक्षताच्या कुटुंबीयांकडून भक्कमपणे बाजू मांडण्यात आली. या वेळी आगरी समाजातील सर्व वकिलांनी अक्षताला छळणाऱ्या तिच्या सासरकडील मंडळींना कठोर शिक्षा होईपर्यंत अक्षताच्या कुटुंबीयांच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहणार असल्याचे प्रसार माध्यमांसमोर सांगितले.

# सीमाशुल्क विभागाकडून 10 कोटींचे सोने, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, परकीय चलन जप्त

## २४ प्रकरणांमध्ये कारवाई | ७ सुवर्ण तस्करांना अटक

**मुंबई** : विमानतळ आयुक्तालय, मुंबई सीमाशुल्क विभाग-३ ने १० ते १४ जुलैदरम्यान एकूण २४ प्रकरणांमध्ये जवळपास १०.३३ कोटी रुपये मूल्याचे १३.२४ किलोपेक्षा जास्त सोने आणि इलेक्ट्रॉनिक्स वस्तू जप्त केल्या आहेत. यामध्ये ०.४५ कोटी रुपये किमतीच्या परकीय चलनाचा देखील समावेश आहे. मेणामध्ये मिसळलेली सोन्याची भुकटी, घडवण्यासाठी आणलेले दागिने, सामानात लपवून, कपड्यांमध्ये, कागदाच्या थरांमध्ये, शरीरात आणि तस्करांच्या शरीरावर लपवलेल्या सोन्याच्या पट्ट्या अशा विविध कल्पक स्वरुपात होत असलेली सोन्याची तस्करी या कारवायांमध्ये उघडकीला आली. या वेळी सात सुवर्ण तस्करांना अटक करण्यात आली.





दुबई (२), अबुधाबी (२) आणि जेद्दाह (१) येथून आलेल्या पाच भारतीय नागरिकांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून २४ कॅरेट सोन्याची भुकटी, २४ कॅरेट कच्च्या सोन्याच्या साखळ्या आणि बांगड्या अश्या स्वरूपातील एकूण ४,८५० ग्रॅम वजनाचे सोने जप्त करण्यात आले. हे सोने शरीरामध्ये, कपड्यांच्या थरांमध्ये, शरीरावर, आणि सामानात दडवण्यात आले होते. या प्रकरणी पाच सुवर्ण तस्करांना अटक करण्यात आली.

उत्तर प्रदेशमध्ये मुझफ्फरनगर आणि उत्तराखंडमध्ये हरिद्वार येथील रहिवासी असलेल्या दोन भारतीय नागरिकांना सीआयएसएफने अटक केली आणि एआययूच्या ताब्यात दिले. त्यांच्या हातातील पिशवीत एकूण १,९५० ग्रॅम वजनाची मेणात मिसळलेली २४ कॅरेट सोन्याची भुकटी होती. या वेळी दोन सुवर्ण तस्करांना अटक करण्यात आली. एका विमानाच्या तपासणीदरम्यान एकूण ३,१९९ ग्रॅम वजनाचे २४ कॅरेट सोने मिश्रीत मेण जप्त करण्यात आले. त्यामधील सोने ३,०१० ग्रॅम वजनाचे होते. त्याची अंदाजे किंमत १,८९,७९,९७६ रुपये इतकी होती. हे सोने विमानाच्या प्रसाधनगृहातील नळा खालच्या जागेत दडवले होते. बँकॉकला जाणाऱ्या दोन परदेशी नागरिकांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून ७,३०० युरो, २,५०० अमेरिकन डॉलर्स, २९,००० पाऊंड स्टर्लिंग आणि १२,००० न्यूझीलंड डॉलर्स, असे ४४,७६,३८० रुपये मूल्याचे परदेशी चलन जप्त करण्यात आले. हे चलन लॅपटॉप बॅगमध्ये शिवलेल्या चोर कप्प्यात दडवण्यात आले होते.

अबुधाबी (१२), दुबई (०२), बहरीन (१), शारजाह (१) येथून आलेल्या १६ भारतीय नागरिकांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून ३४३१.०० ग्रॅम सोने आणि २,१६,३४,६५५ रुपये किमतीच्या इलेक्ट्रॉनिक वस्तू जप्त करण्यात आल्या. हा तस्करीचा माल बॅगा, कागदाचे थर, इजारीचे खिसे, शरीरावर आणि तस्करांच्या शरीरावर लपवण्यात आले होते.

# संपादकीय

## जातो माघारी पंढरीनाथा...



संपादक दिपक मोरेश्वर नाईक


'उड उड रे काऊ,
तुझे सोन्याने मढवीन पाऊ,
पाहुणे पंढरीरावो घरास येती!
पैलतोगे काऊ कोकताहे,
शकून गे माये सांगताहे...'

पन्नासेक वर्षांपूर्वी लताच्या आवाजात 'ज्ञानेश्वरी' लोकांसमोर आली, तेव्हा या अभंगातील ही कल्पनाच विलक्षण वाटली. थेट विठूराय 'पाहुणा' म्हणून घराकडे येण्याच्या 'अलौकिक' घटनेचा शकून संगणाऱ्या कावळ्याचे पंख 'सोन्याने मढवून' देणं... ही ज्ञानेश्वरांची प्रतिभा! त्याही आधी 'विठ्ठला, देवा आलास माझ्या दारी, पण थांब जरासा विटेवरी...' हे भक्तीगीतही रेडिओवर लागायचं. मात्या-पित्यांच्या सेवेत गुंतलेल्या पुंडलिकासाठी 'संतजनांचा जरी तू राणा, माझ्या घरी रे आज पाहुणा...' हे सत्य होतं. म्हणून दारी आलेल्या 'पाहुण्या'ला विनवणी करत, उभं रहाण्यासाठी पुंडलिक जवळची वीट विठ्ठलासमोर सारतो... जिच्यावर आज विठ्ठल पंढरीच्या चंद्रभागेच्या वाळवंटी 'युगे अठ्ठावीस' उभाच आहे! हे प्रतिभेचं देणं. युगे अठ्ठावीस म्हणजे नक्की किती लाख वर्ष, हा प्रश्न निरर्थक. ज्ञानोबांचे आई-वडील विठ्ठलपंत आणि रुक्मिणीबाई पंढरीची वारी करीत. त्या आधीपासून वारी असणार. परकीय आक्रमण काळात काही काळ बंद असली, तरी गेली हजार-आठशे वर्ष चालत आलेली वारकऱ्यांची परंपरा, हे आजचे सत्य.

त्याच सुमारास, 'विठ्ठल तो आला आला मला भेटण्याला...' हे लताचं भक्तीगीतही लोकप्रिय झालं होतं. त्यात 'कधी नाही कुटले टाळ, पंढरीला नाही गेले चुकुनीया एक वेळ...' तरीही परमेश्वर थेट भेटायला येण्यातलं 'चमत्कारी' अप्रूप पी. सावळारामांच्या रचनेत निश्चित होतं. म्हणूनच कदाचित दैनंदिन जीवनाच्या धबडग्यात, पंढरपूरला जाण्याचा मुद्दाम कधी अट्टाहास नाही केला. एकूणच देवाच्या बाबतीत 'देव विठ्ठल, देवपूजा विठ्ठल...' अन 'जेथे जातो तेथे, तू माझा सांगाती...' ही स्वीकारलेली मानसिकता. त्यातून ज्ञानोबा-तुकोबा, एकनाथ-नामदेव अशा अनेक संतांच्या अभंगांपलीकडे अनेक कवींच्या काव्यातून-गाण्यांतून, लेखकांच्या शब्दसाहित्यातून विठ्ठल भेटतच राहिला. एकनाथांच्या 'काया ही पंढरी, आत्मा हा विठ्ठल!' अभंगाच्या भावार्थाचं एक पद आचार्य अत्र्यांनी 'प्रीतीसंगम' नाटकात लिहिलं... 'देह देवाचे मंदिर, आत आत्मा परमेश्वर!' या पदाअखेरीस, 'देव देहात देहात, का हो जाता, देऊळात? तुका संगे मूढ जनां, देव देही का पहा ना?' लिहून तुकाराम-साहित्याच्या अभ्यासकांना कोड्यात पाडलं होतं! दरम्यान, सोपानदेव चौधरींनी वारकऱ्यांच्या दूरवरून येणाऱ्या चाहुलीवरूनच लिहिलेलं अविस्मरणीय काव्य मनावर ठसलं...

आली कुठूनशी कानी टाळ-मृदुंगाची धून,
नाद विठ्ठल विठ्ठल उठे रोमरोमांतून!'
वृक्ष दिसला सामोरी,
काय सांगू त्याची शोभा,
जसे कटीवरी हात युगे अठ्ठावीस उभा,
भूक नयनांची सरे, मूक वाचा ये रंगात,
माझा देह झाला देहू, तुकयाच्या अभंगात!

'श्रीविठ्ठलः एक महासमन्वय' संशोधन-ग्रंथाचे लेखक रा. चिं. ढेरे त्यांच्या पंढरपूरच्या ओढीविषयी लिहितात... 'खरे तर श्रीविठ्ठल हा कळू लागल्यापासून माझ्या प्रेमाचा, कुतूहलाचा अन ओढीचा विषय. ज्या गावात अन् घरात माझे लहानपण गेले होते, ते श्रीविठ्ठलाच्या भक्तीने भारलेले होते. प्रतिवर्षी आषाढी-कार्तिकीच्या वारीत सहभागी होणारे होते. चौदाव्या वर्षी पुण्यात आलो, नागर वातावरणात वाढलो, नव्या जीवनदृष्टीला सामोरा झालो, पण चार तपांपूर्वी मनाच्या तळात खोल रुजलेला विठ्ठलप्रेमाचा संस्कार काही पुसटला नाही.' त्यांच्या विठ्ठल-संशोधनाविषयी म्हणतात, 'भक्तीला भुललेले ते सावळे परब्रह्म इतिहासदृष्ट्या किती प्राचीन आहे, याचा शोध घेण्याची भक्तदृष्टीला आवश्यकता नसते... तो ज्या पुंडलिकासाठी आला, तो पुंडलिक केव्हा नि कुठे होऊन गेला, या विषयीची जिज्ञासा संतांना व्यर्थ वाटते. कर्मठतेतून मुक्त करून तिला जीवनसन्मुख रसिकता प्रदान करणारा लोकसखा कृष्णच विठ्ठलरूपाने पंढरपुरात नांदतो आहे, अशी सकळ संतांची धारणा आहे!' ही पंढरीला जाण्याची ओढ नास्तिकालाही वाटावी? दुर्गाबाई भागवत मुळच्या पंढरपूरच्या. आजोबांना पंढरपुराबद्दल कायम मनात अढी. त्यांच्या वडिलांच्या अन्यायी वागणुकीमुळे आईचा मृत्यू झाल्याच्या भावनेनं त्यांनी पंढरपूर सोडलं, वडिलांचं 'पांडुरंग' नावही टाकलं. वार्धक्यात पुन्हा पंढरपुरात आल्यावर त्यांनी धार्मिक ग्रंथवाचन भरपूर केलं, पण पांडुरंगाचं देऊळ कायम वर्ज्य! दुर्गाबाईंचे वडील शास्त्रज्ञ... म्हणजे नास्तिकच. जन्मभूमी नसली तरी पंढरपूर ही दुर्गाबाईंची कुळभूमी होती. अध्यात्माचा पूर्ण अभाव असला तरी वारकरी परंपरेविषयी कुतूहल. 'या साऱ्या वाटा अखेर पंढरीलाच जातात का?' प्रश्न पडायचा. त्यामुळे नास्तिक दुर्गाबाईंना पंढरपूर पहायचा ध्यास मात्र होता. अचानक पंढरपूरला जायचा योगही आला. त्याविषयी 'पैस'मध्ये दुर्गाबाई अनुभव सांगतात... 'विटेवरच्या पांडुरंगाचे दर्शन घेतलं. भक्तीचा उमाळा नव्हता. आनंद नव्हता. दुःखही नव्हतं. मन अगदी निराकार स्तब्ध होतं... असं निराकार क्वचितच होतं! चंद्रभागेच्या तीराशी ओळख कायम झाली!' 'पंढरीला नाही गेलो चुकुनीया एक वेळ...' अशा सोयीस्कर मानसिकतेत असताना, ध्यानीमनी नसताना गेल्या कार्तिकाअखेरीस पंढरपूरला प्रथमच जाण्याचा योग आला! तुळजापूर करून



पंढरपूरला पोहोचेपर्यंत उन्हं उतरत होती. नेहमीची गर्दी होतीच. सांजारती झाल्यावर मंदिराच्या मंडपात प्रवेश मिळाला. गरुड खांबाजवळ येताच ओठावर नित्यपूजेच्या वेळचे शब्द आले, 'तीर्थ विठ्ठल, क्षेत्र विठ्ठल... देव विठ्ठल, देवपूजा विठ्ठल...' काळ्या पाषाणातील विठ्ठलाला 'सुंदर ते ध्यान उभे विटेवरी' असं तुकोबांनी का म्हटलं, त्याचा प्रत्यय गाभाऱ्यात शिरण्याआधी दुरूनच आला. 'भेटींलागी जीवा, लागलीसे आस...' अशी अवस्था झाली. गाभाऱ्यातल्या गर्दीत दर्शन काही सेकंदांचच, त्यात विठोबाच्या पायी डोकं टेकण्याची संधी मिळाली... डोकं टेकून वर पाहताना क्षणभर मूर्ती अस्पष्ट, धूसर वाटली! 'चला, चला, इतरांना दर्शन घायचंय!' स्वयंसेवकांच्या रेट्यामुळे गाभाऱ्याबाहेर आलो. हरवल्यासारखा राउळाबाहेरच्या कट्ट्यावर स्तब्ध बसून राहिलो... 'विठ्ठला-घरी' काही क्षण विसावलो. ज्ञानोबा-तुकोबा आदी लोकोत्तर संतांनी डोकं टेकलं, त्या चरणांवर डोकं टेकल्याचं थेट समाधान... घरबसल्या कसं मिळावं? 'पंढरीला न जाण्याच्या' मानसिकतेला उत्तर मिळालं... 'वारी'ची अंतरीची ओढ कळली! विठ्ठलाच्या देवळाबाहेर 'रखुमाबाई'चं देऊळ वेगळं. राही आल्यामुळे रखुमाई रुसली, रानात जाऊन बसली. ती सापडल्यावर विठ्ठल तिला म्हणाला, 'चल, आपला संसार तर तुटलाच. तरी आपण वेगळं राहू. रोज भेटू, बोलू, भक्तांचं भलं करू...' अशी आख्यायिका. म्हणून रखुमाईच्या दर्शनाशिवाय विठ्ठलदर्शन अपूर्ण! रात्री 'वेदांत' भक्तीनिवासात शिरताना गदिमांचे शब्द आठवले, 'वेदांनाही नाही कळला, अंतःपार ज्याचा, कानडा राजा पंढरीचा!' दुसऱ्या दिवशी 'राजाची पंढरी' पाहण्याच्या निमित्ताने राउळाभोवती प्रदक्षिणा झाल्या. जिथं आषाढी-कार्तिकीला भक्तांचा 'खेळ मांडीयेला वाळवंटी घाई, नाचती वैष्णव भाई रे...' अशा चंद्रभागेच्या प्रवाहात दिवे सोडले. अखेर पंढरीचा निरोप घेताना तुकोबांचीच भैरवी ओठावर आली... 'धन्य झालो आम्ही जन्माचे, नाम घेऊ तुझे आवडीने... जातो माघारी पंढरीनाथा, तुझे दर्शन झाले आता!'

# आपलं सर्वोच्च न्यायालय आता झालं पंच्याहत्तर वर्षांचं

होय! आपलं सर्वोच्च न्यायालय आता पंच्याहत्तर वर्षांचं झालंय. १९४७ ला स्वातंत्र्य मिळाल्यापासून ते आजपर्यंत देशाच्या लोकशाहीला जिवंत आणि पवित्र ठेवणाऱ्या आपल्या सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच आपले अमृतमहोत्सवी वर्ष साजरे केले. देशाच्या प्रत्येक नागरिकाला आश्वस्त करणाऱ्या न्यायप्रणालीला आणि न्यायाच्या अमूर्त वारश्याला पवित्र ठेवणाऱ्या या संस्थेबद्दल आज संपूर्ण देश कृतज्ञ आहे; परंतु याच आपल्या सर्वोच्च न्यायालयाबद्दल, त्यांच्या कार्याबद्दल, न्यायालयाच्या इतिहासाबद्दल सर्वसामान्यांना फार कमी गोष्टी माहीत आहेत, त्यामुळे आज न्यायदानाची पंच्याहत्तरी गाठलेल्या सर्वोच्च न्यायालयाचा आढावा घेऊ.

न्यायालयाचा इतिहास :- यतो धर्मस्ततो जयः म्हणजे ज्या ठिकाणी धर्म (सत्य) असतो त्याच ठिकाणी विजयश्री वास करत असते. या पवित्र निर्धाराने आपलं काम करणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या इतिहासाची सुरुवात होते ती २६ जानेवारी १९५० पासून. नुकतंच दशकांचे पारतंत्र्य अनुभवलेल्या भारतासाठी आपली सुरुवात करण्याची वेळ आली होती. संविधान निर्मितीचं काम सुरू असताना देशातील न्याय व्यवस्था कशी असावी, याबद्दल तब्बल दोन वर्षांची समग्र चर्चा झाल्यानंतर आपल्या देशात न्यायप्रणालीचा विकास झाला. संविधान सभेने २६ जानेवारी १९५० रोजी संविधान स्वीकार करून संविधानाची अंमलबजावणी केली, तसं देशात तत्काळ काही तरतुदी लागू झाल्या. भारतीय न्यायव्यवस्था हीही त्यातील एक बाब. भारताचे सर्वोच्च न्यायालय ही भारतीय संविधानाच्या अंतर्गत सर्वोच्च न्यायिक संस्था आहे. संविधानाच्या पाचव्या खंडातील चौथ्या भागात अनुच्छेद १२४ ते १४७ मध्ये संघ न्यायव्यवस्थेची तरतूद आढळते. यातील अनुच्छेद १२४ नुसार देशात सर्वोच्च न्यायालयाची आखणी करण्यात आलेली आहे.

२८ जानेवारी १९५० रोजी भारत एक सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक बनल्यानंतर दोन दिवसांनी सर्वोच्च न्यायालयाचे उद्घाटन झाले. याचे उद्घाटन जुन्या संसद भवनाच्या नरेंद्र मंडळात करण्यात आले, जिथे भारतीय संघाचे न्यायालय १९३७ ते १९५० पर्यंत १२ वर्षे कार्यरत होते. उद्घाटनाच्या समारंभात तत्कालीन सरन्यायाधीश हरीलाल कानिया यांच्या समवेत पाच इतर न्यायाधीशांचीदेखील हजेरी या कार्यक्रमास होती. यासोबत जवाहरलाल नेहरू आणि इतर प्रांताचे प्रमुख यांनीदेखील या कार्यक्रमास हजेरी लावली. यासोबत सर्वोच्च न्यायालयाचे नियम प्रकाशित झाले आहेत, याची खात्री करण्यासाठी तसेच फेडरल न्यायालयाच्या सर्व वकिलांची आणि एजंटांची नावे सर्वोच्च न्यायालयाच्या यादीमध्ये प्रविष्ट केली गेली आहेत, याची खात्री करण्यासाठी या उद्घाटन समारंभाची केलेली नोंददेखील आपल्याला आढळते.

यानंतर सर्वोच्च न्यायालयाने १९५८ पर्यंत टिळक मार्ग, नवी दिल्ली येथील जुन्या संसद भवनात न्यायदानाचे कार्य केले. १९५८ मध्ये हे न्यायालय नवीन इमारतीत स्थलांतरित झाले. भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी ४ ऑगस्ट १९५८ रोजी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सध्याच्या इमारतीचे उद्घाटन केले. हे झालं सर्वोच्च न्यायालयाच्या इतिहासाबद्दल! आता आपण न्यायालयाची रचना पाहू.

सर्वोच्च न्यायालयाची रचना :- १९५० च्या मूळ संविधानात सर्वोच्च न्यायालयाची रचना ही मुख्य न्यायाधीश आणि इतर सात सहयोगी न्यायाधीश अशी होती. संविधानातील तरतुदीनुसार सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या वाढवण्याची जबाबदारीही संसदेवर



सोडण्यात आली. संसदेने १९५६ मध्ये न्यायाधीशांची संख्या ८ वरून ११ केली. पुढे १९६० मध्ये १४, १९७८ मध्ये १८, १९८६ मध्ये २६, २००९ मध्ये ३१ आणि नुकतीच २०१९ मध्ये ३४ असा न्यायाधीशांच्या पदांचा विस्तार करण्यात आला. बरं न्यायाधीश कोण असावा आणि त्याची पात्रता काय असावी, याचीदेखील तरतूद संविधानाच्या पानांमध्ये आढळते. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यासाठी ती व्यक्ती भारताची नागरिक असणे आवश्यक आहे. यासोबत किमान पाच वर्षे उच्च न्यायालयाचे न्यायाधीश किंवा किमान १० वर्षे उच्च न्यायालयाचे वकील असणे आवश्यक आहे. तसेच ती व्यक्ती राष्ट्रपतींच्या मते एक निष्णात कायदेतज्ज्ञ असणे आवश्यक आहे. अशा एकूण अटींची पूर्तता करून देशात न्यायाधीशांची नेमणूक राष्ट्रपतींमार्फत केली जाते. ही नेमणूक करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाची स्वतंत्र कोलीजीअम् प्रणालीदेखील आहे. या प्रणालीनुसार आज सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती करण्याचा अधिकार फक्त सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांनाच दिलेला आहे.

आज सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश दोन किंवा तीन अशा संख्येच्या खंडपीठांमध्ये बसतात. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठांमधील परस्परविरोधी निवाडे किंवा राज्यघटनेच्या व्याख्येशी संबंधित कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नावर निर्णय घेण्यासाठी पाच किंवा त्याहून अधिक न्यायाधीशांची खंडपीठे स्थापन करण्यात येतात. आता महत्त्वाचे प्रश्न असलेल्या गहन प्रश्नांमध्ये अशा खंडपीठांची रचना केली जाते. ज्या खंडपीठात पाचपेक्षा जास्त न्यायाधीश बसतात त्या खंडपीठांना 'संविधान पीठ' असे म्हटले जाते. बरं ही सर्व कार्यप्रणाली फक्त इंग्रजीमध्ये चालते हे विशेष. कारण ज्या देशात पाच हजारांहून जास्त प्रादेशिक भाषा बोलल्या जातात, त्या राष्ट्रात एकसंधता राहावी, यासाठीची ही तरतूद असावी.

न्यायव्यवस्था :- भारतीय राज्यघटनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे संघराज्य व्यवस्थेचा अवलंब करूनही आणि त्यांच्या संबंधित प्रदेशांमध्ये केंद्र व राज्य कायदे अस्तित्वात असूनही, केंद्र आणि राज्य दोन्ही कायद्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी न्यायालयांच्या एकात्मिक प्रणालीची केलेली तरतूद! म्हणजे देशात राज्यांचा वाद असो, केंद्राचा वाद असो किंवा केंद्र आणि राज्य या दोघांमधला वाद असो, आपल्या देशात एकात्मिक न्यायप्रणालीमुळे सर्व प्रकरणाची दखल ही सर्वोच्च न्यायालयाकडूनच घेतली जाते. थोडक्यात काय तर आपल्या देशात संपूर्ण न्याय व्यवस्थेच्या शिखरावर भारताचे सर्वोच्च न्यायालय आहे. यांच्या खालोखाल प्रत्येक राज्यासाठी किंवा राज्यांच्या समूहासाठी एक स्वतंत्र उच्च न्यायालय अशी तरतूद आपले संविधान करते. याच आधारावर देशात दिल्लीला सर्वोच्च न्यायालय तर इतर २५ ठिकाणी उच्च न्यायालयांची रचना आपल्याला बघायला मिळते. संविधानातील न्यायालयांची व्यवस्था आणि आजची परिस्थिती बघता देशात सर्वोच्च न्यायालयाची गरज दैनंदिन आयुष्यात तुम्हा आम्हाला चांगलीच माहिती झाली आहे. म्हणून सर्वोच्च न्यायालयाची एकूण रचना, कार्य आणि पारदर्शकता बघता सर्वोच्च न्यायालयाला संविधानाचा पालक म्हणूनदेखील ओळखले जाते. अनुच्छेद ३२ नुसार न्यायदान करण्याचे हक्क मिळाल्यामुळे संविधानाचे हे पालकत्व सर्वोच्च न्यायालयाने हुबेहूब निभावले आहे. नवीन हिंदुस्तानाच्या नवीन संविधानाचे पावित्र्य राखण्यासाठी अस्तित्वात आलेली ही वास्तू गेल्या ७५ वर्षांत देशाचं, नागरिकांचं आणि पर्यायाने आपल्या लोकशाही मूल्याचा पाया असणाऱ्या आपल्या संविधानाचं रक्षण मोठ्या उमेदीने करत आलेली आहे. इथून पुढे देखील देशाच्या संस्कृतीला आणि लोकशाही तत्त्वांना टिकवण्याची ताकद या संस्थेला मिळो, हीच एक भारतीय नागरिक म्हणून अपेक्षा!

MIRA BHAINDAR MUNICIAL CORPOTATION
Water Supply & Sewerage Department
Indira Gandhi Bhavan,Chatrapati Shivaji Maharaj Marg.
Bhayandar (W)401101,Tal.Dis – Thane,28192828

Date – 18/07/2024

|| EXTENTION ||

Kindly refer to the Re-Tender Notice No. 02 (2024-25) published on Dt. 06/07/2024 in Lokdrishti & Dt. 09/07/2024 in Police Batmi Patra.

For the work in Re-Tender Notice No. 02 (2024-25) (2024_MBMC_1049562_1) tender notice submission date was Dt. 18/07/2024 up to 1.00 p.m. is extended Dt. 25/07/2024 up to 1.00 p.m. Also the Technical Bid will open on dated 29/07/2024 at 3.00 pm.

Other conditions shall remain unchanged.

**Ref. No.:- MBMC|PRO|E2372012|2024-25**
**Date :- 18/07/2024**

**(Deepak Khambit)**
**City Engineer**
**Mira Bhaindar Municipal Corporation**

## वजन घटवण्यासाठी 'पीनट बटर' उपयुक्त

**सँडविचमध्ये** लावण्यासाठी एक अतिशय पौष्टिक 'स्प्रेड' म्हणून 'पीनट बटर', म्हणजेच शेंगदाण्यांपासून तयार केले गेलेले बटर अतिशय लोकप्रिय होऊ लागले आहे. अतिशय पौष्टिक तत्त्वांनी परिपूर्ण असे पीनट बटर वजन घटवण्यासाठीही उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. पीनट बटरमध्ये असणारी प्रथिने, जीवनसत्त्वे आणि क्षार वजन घटवण्यास सहाय्यक आहेत. पीनट बटरच्या सेवनाने भूक लवकर शमत असून, त्यामुळे अन्नाचे सेवन आपोआपच कमी होते. याच्या सेवनाने शरीराची चयापचय शक्ती वाढत असून त्यामुळेही वजन घटण्यास मदत होते.

पीनट बटर पोळीबरोबर, भाकरीबरोबर किंवा गव्हापासून तयार केलेल्या ब्रेडसोबत खाता येऊ शकते. फळे किंवा कच्च्या भाज्यांच्या कापांच्या सोबतही हे बटर खाता येते. सकाळच्या नाश्त्यामध्ये ओटमील घेत असल्यास किंवा दह्यामध्ये मिसळूनही पीनट बटरचे सेवन करता येते. मात्र वजन घटवताना पीनट बटर आहारामध्ये समाविष्ट करताना त्यामध्ये इतर 'अॅडिटिव्ह' असणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. पीनट बटर बाजारातून आणण्यापेक्षा घरी तयार करणे अधिक चांगले. हे बटर बनवण्यासाठी शेंगदाणे भाजून घ्यावेत आणि त्यांची साले काढून घ्यावीत.

त्यानंतर शेंगदाणे मिक्सरमध्ये घालून त्यावर थोडेसे शेंगदाण्याचे तेल घालावे, त्यानंतर मिक्सर सुरू करून शेंगदाणे तीन ते चार मिनिटे मिक्सरवर वाटावेत. तयार झालेल्या शेंगदाण्याच्या पेस्टला पीनट बटर म्हटले जाते. यामध्ये चवीला थोडेसे मीठ घालावे. तसेच आवडत असल्यास किंचित मध आणि दालचिनीची पूड ही यामध्ये घालता येऊ शकते.



# तेल लावताना केस का गळतात?

केसांना नियमित तेल लावावे. त्यामुळे केसांचा कोरडेपणा, निस्तेजपणा, कोंडा, फाटे फुटणे यांसारख्या समस्या कमी होतात. त्याचबरोबर धूळ, प्रदूषण यापासून केसांचे संरक्षण होते, असे आपण आई-आजीकडून ऐकत आलो आहोत. परंतु जेव्हा तुम्ही तेल लावता तेव्हा प्रत्येक वेळी केस गळतात. असे का होते? हे जाणून घेण्यासाठी आम्ही मार्वी आन बेक अकादमीच्या हेयर आणि ब्युटी एक्स्पर्ट नंदिनी अग्रवाल यांच्याशी संवाद साधला.



**तेलामुळे** केस मजबूत होतात. त्यांचा फ्रिझीनेस कमी होतो आणि केस तुटण्याला आळा बसतो. पण यामुळे केस गळूदेखील लागतात. एका हेयर फॉलिकलमधून १-६ वर्ष केस वाढू शकतात. म्हणून जुने केस गळून नवीन येणे ही सातत्याने होणारी प्रक्रिया आहे.

म्हणून जेव्हा तुम्ही केसांना तेल लावाल तेव्हा काही वेळ केसांना मसाज करा. अशावेळी केस गळणे काहीसे स्वाभाविक असते. परंतु, केस गळण्याचे प्रमाण अधिक असल्यास हे काळजीचे कारण ठरेल. केसातील अतिरिक्त तेल व्यवस्थित निघून जाईपर्यंत केस स्वच्छ धुणे गरजेचे आहे. कारण केसात तेल राहिल्याने धूळ, धूर, इतर प्रदूषणजन्य घटक केसात चिकटून राहण्याची शक्यता असते. तसेच त्यामुळे स्काल्फजवळील पोर्स बुजतात आणि हेयर फॉलिकल्स ब्लॉक होतात. परिणामी केस गळू लागतात.

तेलकट स्काल्फमुळे केसांत कोंडा होतो व केस गळू लागतात. तसंच खूप तेल लावल्याने स्काल्फमधील नैसर्गिक तेलाशी त्याचे संतुलन साधले जात नाही. त्यामुळे केस कमकुवत होऊन अधिक खराब होऊ लागतात.



टीप: केसांना मसाज करताना स्काल्फला हळुवार मसाज करा. कारण खूप जोरजोरात मसाज केल्याने केस गळू लागतील. त्याचबरोबर अधिक प्रमाणात तेल लावू नका आणि केसातील तेल निघून जाईल अशापद्धतीने स्वच्छ केस धुवा.

## सावधान! टी बॅग आरोग्यासाठी धोकादायक

चहा तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या चहा पिशव्या (टी बॅग) आरोग्यासाठी जोखमीच्या ठरू शकतात. कपातील गरम पाण्यात अथवा दुधात या चहाच्या पिशव्या बुडवल्या जातात. त्यामुळे लक्षावधी सूक्ष्म आणि अतिसूक्ष्म आकाराचे प्लास्टिकचे कण अशा गरमागरम चहामध्ये मिसळू शकतात, असा दावा एका अभ्यासात करण्यात आला आहे.



**चहाद्वारे** पोटात गेलेल्या अशा प्लास्टिकच्या सूक्ष्म-अतिसूक्ष्म कणांचे आरोग्यावर होणारे संभाव्य दुष्परिणाम सध्या तरी स्पष्टपणे माहीत झालेले नाहीत, असे या अभ्यासात नमूद केले आहे.

जसजसा कालावधी उलटत जातो, तसतसे प्लास्टिकचे सूक्ष्म अशा कणांमध्ये विघटन होत जाते. पुढे त्यापेक्षाही लहान अशा नॅनो आकाराच्या कणांमध्ये ते विघटित होते. हे कण शंभर नॅनोमीटरपेक्षाही कमी आकाराचे असतात.

कॅनडामधील मॅकगिल विद्यापीठातील संशोधकांनी पर्यावरणात, जलचरांमध्ये आणि अन्नाच्या साखळीत आढळून येणाऱ्या प्लास्टिकच्या सूक्ष्म कणांचे अस्तित्व लक्षात आणून दिले आहे; परंतु प्लास्टिकचे हे सूक्ष्म कण मानवाच्या प्रकृतीला हानीकारक आहेत की नाही, याबाबत त्यांना अद्याप कोणताही निष्कर्ष काढता आलेला नाही.

चहा तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या चहा पिशव्यांतून असे सूक्ष्म आणि नॅनो आकाराचे प्लास्टिक कण चहामध्ये मिसळतात काय, असा प्रश्न नाथाली टुफेन्क्जी आणि अन्य संशोधकांना पडला. अशा कणांचा डाफ्निया मॅग्ना किंवा वॉटर फ्लीज (पाणी पिसू) अशा जलचर प्राण्यांवर काही परिणाम होतो काय, हे तपासून पाहिले.

पर्यावरणविषयक अभ्यासात हे प्राणी नेहमीच एक प्रतिमान म्हणून वापरले जातात. संशोधकांनी चार वेगवेगळ्या उत्पादकांच्या चहाच्या पिशव्या कापून त्यातील चहा काढून घेतला.

त्यानंतर या रिकाम्या प्लास्टिक पिशव्या एका भांड्यातील गरम पाण्यात सोडण्यात आल्या. चहा तयार करण्याच्या तापमानाइतके या पाण्याचे तापमान होते. या पाण्याची इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शकाखाली तपासणी केली असता, एका प्लास्टिक चहा पिशवीपासून प्लास्टिकचे ११६० कोटी सूक्ष्म कण आणि ३१० कोटी नॅनो कण विलग झाल्याचे दिसून आले. यापूर्वी अन्नपदार्थात आढळून आलेल्या प्लास्टिक कणांच्या तुलनेत हे प्रमाण काही हजार पटींनी अधिक आहे.

दुसऱ्या प्रयोगात या प्लास्टिक कणांचा पाणी पिसूंच्या शरीरावर आणि वर्तणुकीवर परिणाम दिसून आल्याचे या संशोधकांनी सांगितले. मानवाच्या आरोग्यावर असे काही परिणाम होतात काय, यावर अभ्यास होणे गरजेचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

## स्वयंपाकघरातच दडलंय वजन कमी करण्याचं रहस्य

बदलत्या जीवन शैलीमुळे लोकांमध्ये लठ्ठपणाची समस्या वाढताना दिसत आहे. वजन कमी करण्यासाठी प्रत्येक जण सतत प्रयत्नशील असतो. वजन कमी करण्यासाठी लोक विविध प्रकारच्या औषधांचा देखील वापर करतात. परंतु डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेतलेल्या औषधांचा वाईट परिणाम शरीरावर होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे वजन कमी करण्याचं मोठं रहस्य तर आपल्या स्वयंपाकघरात दडलेलं आहे.

**मेथीच्या बिया :** एक चमचा मेथीदाणे पाण्यासोबत घेतल्यास अपचनाची समस्या दूर होते. मेथीचे दाणे आर्थरायटीस आणि साईटिका समस्यांवर रामबाण उपाय आहेत. सुमारे एक ग्राम मेथीदाण्यांची पावडर आणि सुंठ पावडर यांचे मिश्रण गरम पाण्यातून दिवसभर दोन-तीन वेळा घेतल्याने लाभ होतो.



**जिरे :** शरीरातील अनावश्यक चरबी बाहेर काढण्यास जिरे मदत करते. तसेच जिरेपूड खल्ल्यानंतर एक तास काहीही खाऊ नका. भाजलेले हिंग, जिरे, काळे मीठ आणि पावडर १-३ ग्रॅम समान प्रमाणात करा. हे मिश्रण दिवसातून दोन वेळा दह्यासोबत घ्या. त्यामुळे तुमचा लठ्ठपणा कमी होईल

**लसूण :** लसणामध्ये एलिसिन घटक मुबलक प्रमाणात आढळत असल्याने फॅट बर्न करण्यास मदत होते. यामुळे वजन आटोक्यात ठेवण्यासही मदत होते. लसणामध्ये फायबर्स घटक बद्धकोष्ठता, पचनाचे विकार कमी करण्यास मदत करतात.

**मध आणि लिंबू :** सकाळी उठल्यानंतर कोमट पाण्यात एक चमचा मध आणि अर्धा लिंबू पिळून ते पाणी प्यावे. यामुळे सारख्या लागणाऱ्या भुकेवर नियंत्रण राहते.

## एकाग्रता वाढवण्यासाठी करा स्वस्तिकासन

**स्वस्तिक** हे कल्याणकारी चिन्ह आहे. बैठक स्थितीत शरीराची कल्याणकारी स्थिती घेणे म्हणजेच स्वस्तिकासन करणे होय. हे बैठकस्थितीतील आसन आहे. प्रथम पाय पसरून ताठ बसावे, नंतर उजव्या पायाची टाच डाव्या जांघेत बसवावी आणि डाव्या पायाची टाचवरून उजव्या जांघेत बसवावी. हाताची ज्ञानमुद्रा ठेवून समोर पहावे. या आसनात कितीही वेळ स्थिर राहता येते. आता डाव्या पायाने वरील कृती करावी. चित्त एकाग्र होण्यासाठी हे आसन चांगले आहे. खूप श्रमाने पाय दुखत असतील तर या आसनात बसावे. सुरुवातीला पंधरा सेकंद बसावे. नंतर कालावधी तीन मिनिटांपर्यंत वाढवावा. तीन महिने हे आसन नियमितपणे केल्यास तुम्हाला जास्त तास एका ठिकाणी बसण्याची सवय लागेल. पद्मासनापेक्षा बसण्यास सोपे असे हे आसन आहे. स्वस्तिकासनात छाती आणि दंड सरळ ठेवावेत. मन शांत आणि स्थिर राहण्यासाठी स्वस्तिकासन प्रभावी आहे. भजन, कीर्तनसमयी स्वस्तिकासन घालण्याची पद्धत आहे. लहान मुलांच्या मनाची चंचलता या आसनाने दूर होते. करायला सोपे असे हे ध्यानात्मक आसन आहे. यामुळे हाता-पायांचे स्नायू मजबूत होतात. चेहऱ्यावर शांतता आणि प्रसन्नता येते, कारण एकाग्रतेमुळे मनाचा समतोल राहतो. ताणतणाव दूर करण्यासाठी सर्वांनी रोज करावे असे हे योगासन आहे.



## कमळफुलाची चटणी



**साहित्य :** कमळाचे फूल १ (लोटस) (वॉटर लिली नाही), ओल्या नारळाचा चव १ वाटी, हिरव्या मिरच्या २, आलं १ इंच, जिरे १ टीस्पून, मीठ १ टीस्पून, साखर चिमूटभर. **पाककृती :** कमळफुलाच्या पाकळ्या वेगळ्या करून त्या दोनदा पाण्यातून स्वच्छ धुवून घ्या. पाकळीच्या देठाजवळचा पिवळसर पांढरा भाग काढून टाका. मग इतर सर्व साहित्य आणि पाकळ्या मिक्सरमधून भरड वाटून घ्या. कमळाची चटणी तयार आहे.

**अधिक टिप्स**

- शक्यतो गुलाबी कमळाच्या पाकळ्यांचा वापर करावा.
- याच पाककृतीप्रमाणे मीठ, मिरच्या आणि जिऱ्याऐवजी साखर आणि गुलकंद वापरून गोड चटणी बनवता येते.

## केसांसाठी टोमॅटो इतका फायदेशीर आहे, आपल्याला माहीत आहे का?

टोमॅटोत अँटीऑक्सिडेंट्स आणि व्हिटॅमिन्स भरपूर प्रमाणात असतात. टोमॅटोचे सेवन करणे तसेच त्वचेवर फायदेशीर असतं, त्याच प्रकारे केसांना टोमॅटो लावल्याने रुक्ष केसांमध्ये देखील चमक येऊन जाते.

- टोमॅटो ज्यूस केसांना लावल्याने केसांची रचना मुलायम होते आणि चमक देखील वाढते.
- टोमॅटो ज्यूस लावल्याने पीएच पातळी संतुलित राहते ज्यामुळे केस दाट होतात.
- टोमॅटोमध्ये मोठ्या प्रमाणात व्हिटॅमिन ए आणि व्हिटॅमिन सी आढळतं ज्यामुळे स्कॅल्पला मजबुती मिळते.
- टोमॅटो ज्यूस लावल्याने केस मजबूत होतात आणि दोन तोंडी केसांपासून देखील मुक्ती मिळते.
- टाळूवर खाज सुटत असल्यास ३ टोमॅटोच्या पल्पमध्ये २ चमचे लिंबाचा रस मिसळून टाळूवर लावा. अर्ध्या तासाने गार पाण्याने केस धुवून घ्या. या वेळी शॅम्पू वापरण्याची गरज नाही.
- आपले केस रुक्ष झाले असल्यास किंवा आपण डॅंड्रफमुळे परेशान असाल तर टोमॅटोच्या ज्यूसमध्ये मध मिसळून केसांवर लावा. अर्ध्या तासाने केस धुवून घ्या.
- दाट केसांसाठी २ चमचे एरंडेल तेल आणि १ टोमॅटोची प्युरी मिसळून पेस्ट तयार करा. आता ही पेस्ट कोमट करून घ्या. ही पेस्ट टाळूवर लावा. स्कॅल्पवर मालीश करा. नंतर एक तास असेच राहू द्या आणि मग केस धुवून घ्या.



## 'या' व्यक्तींनी बदाम खाणं टाळावं

प्रत्येकाच्या स्वयंपाकघरात बदाम नक्कीच असतात. बदामाचे नियमित सेवन करणं आरोग्यास कायम फायदेशीर असतं. बदामाने स्मरणशक्ती तल्लख होते. बदामामध्ये प्रोटीन, व्हिटॅमिन्स आणि मिनरल्स असतात. आरोग्याबरोबरच बदाम खाणे सौंदर्यासाठीही फायदेशीर ठरते. परंतु काही व्यक्तींसाठी बदाम खाणं नुकसानकारक ठरण्याची शक्यता असते.



- उच्च रक्तदाबाचा त्रास असलेल्यांनी बदामाचे सेवन टाळावे. कारण रक्तदाबाचा त्रास असणारे लोक नियमित औषधे घेत असतात. अशावेळी बदाम ही समस्या अधिक वाढवेल.
- मूतखडा किंवा किडनी स्टोनची समस्या असल्यास किंवा पित्ताशयासंबंधित काही त्रास असल्यास बदामाचे सेवन करणे टाळा. कारण त्यात ऑक्सलेटचे प्रमाण अधिक असते.
- पचनासंबंधित काही समस्या असल्यास बदाम खाऊ नका. बदामात फायबर्सचे अधिक प्रमाण असल्याने समस्या वाढतील. अॅसिडीटीची समस्या असल्यास बदाम खाणे टाळावे.
- बदामात कॅलरीज आणि फॅट्स असल्याने स्थूलतेची समस्या असलेल्यांनी बदाम खाऊ नयेत.

## जाणून घेऊ या काळ्या लसणाचे फायदे

लसूण घातल्यानंतर पदार्थाला आगळीच, खमंग चव येते हे जरी खरे असले, तरी अनेकांना लसणाचा पदार्थाला येणारा वास काहीसा नापसंत असतो. जेव्हा लसणाचा खमंगपणा हवा, पण वास मात्र फारसा नको, तर अशा वेळी काळ्या लसणाचा वापर करावा. याशिवाय काळ्या लसणाचे आरोग्याच्या दृष्टीनेही अनेक फायदे आहेत.

**म्हणूनच** प्राचीन काळापासून काळ्या लसणाचा उपयोग औषधी म्हणूनही करण्यात येत आहे. या लसणाचा उपयोग आशियाई खाद्य परंपरेमध्ये मोठ्या प्रमाणावर होताना पाहावयास मिळतो. कोरिया देशाने तर काळ्या लसणाचा वापर करून हेल्थ प्रोडक्ट तयार केले आहेत, तर थायलंडमध्ये काळ्या लसणाचा वापर करून बनवलेली चॉकलेट्स लोकप्रिय आहेत. काळा लसूण म्हणजे दुसरे तिसरे काही नसून, जून झालेला लसूण असतो. हा लसूण चवीला थोडा गोडसर असून, एखाद्या जेलीप्रमाणे मऊ असतो. हा काळा लसूण नैसर्गिकरीत्या तयार होत नसून, ताज्या लसणाला दहा दिवस चाळीस ते साठ अंश सेल्सियस तापमानावर 'फर्मेंट' करून हा लसूण तयार केला जातो. या लसणाचा वापर अनेक पदार्थांमध्ये केला जातो. सध्या हा लसूण अतिशय लोकप्रिय होत असून, हा ऑनलाइन उपलब्ध आहे.



या लसणाच्या सेवनाचे अनेक फायदे पाहिले गेले आहेत.

काळ्या लसणाच्या सेवनाने शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते. अनेक व्हायरस, बॅक्टेरिया आणि फंगस यापासून होणारे इन्फेक्शन रोखणारी तत्त्वे या लसणामध्ये आहेत. तसेच अनेक त्वचारोगांसाठी देखील याचे सेवन उत्तम आहे. ज्यांना लिव्हरसंबंधी काही विकार असतील, त्यांच्यासाठी देखील या लसणाचे सेवन उत्तम आहे. काळ्या लसणामध्ये अँटी ऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यामुळे काळ्या लसणाचे सेवन करण्यासाठी हा लसूण स्वयंपाकासाठी वापरण्याच्या तेलामध्ये मिसळून ठेवावा. या लसणाच्या सेवनामुळे ब्लड शुगर लेव्हल नियंत्रणामध्ये राहत असून, इन्स्युलीनची पातळीही नियंत्रित राहते. या लसणाच्या नियमित सेवनाने कर्करोगासारखे आजार टाळता येऊ शकतात. तसेच हृदयाच्या आरोग्यासाठी देखील या लसणाचे सेवन उत्तम आहे.

## पावसाळ्यात खराब होऊ शकतो स्मार्ट टीव्ही, आजच बदला या गोष्टी

तुमच्याकडे स्मार्ट टीव्ही असेल तर काही गोष्टींची काळजी तुम्हाला घ्यावी लागेल. कारण, पावसाळ्यात स्मार्ट टीव्ही खराब होऊ शकतात. काही गोष्टी जाणीवपूर्वक हाताळल्यास तुमचा टीव्ही सुरक्षित राहू शकतो.

सध्या जोरात पाऊस बरसत आहे. तुमच्या घरात जर स्मार्ट टीव्ही असेल तर तुम्ही या टीव्हीची काळजी घ्यायला हवी. दरम्यान, स्मार्ट टीव्हीची सुरक्षा ठेवण्यासाठी काही गोष्टी तुम्हाला कराव्या लागतील. जाणून घ्या डिटेल्स.

**वायरिंगची तपासणी करा :** पावसाळ्यात वायरिंगला नुकसान होण्याची भीती असते. जर तुमच्या जवळपास वायरिंगसाठी धोका जाणवत असेल तर लगेच याला ठीक करून घ्या. यासाठी ज्याला पुरेसी माहिती असेल त्याचा सल्ला घ्या.

**वातावरणाची माहिती ठेवा :** स्मार्ट टीव्हीला नेहमी पावसापासून दूर ठेवा. टीव्हीवर पाणी पडणार नाही, याची काळजी घ्या. तसेच वायरलेस इंटरनेट रूटरला सुरक्षित स्थानावर ठेवा.



**स्विच आणि व्होल्टेज सुरक्षा :** तुमच्या स्मार्ट टीव्हीला सुरक्षित ठेवण्यासाठी स्विच आणि व्होल्टेजच्या सुरक्षेवर लक्ष द्या. जर विजेची समस्या येत असेल तर तुमचा टीव्ही खराब होऊ शकतो. त्यामुळे एक व्होल्टेज स्टेबलायझर किंवा यूपीएसचा वापर करा.

**स्मार्ट टीव्हीला सुक्या हाताने हाताळा :** ज्यावेळी तुम्ही स्मार्ट टीव्हीचा वापर करीत असाल त्यावेळी हात ओले नसतील हे पाहा. ओल्या हाताने टीव्हीचे बटन्स, रिमोट किंवा टचस्क्रीनला हात लावल्यास इलेक्ट्रिक शॉक लागण्याची भीती असते. या टिप्सच्या मदतीने तुम्ही स्मार्ट टीव्हीला सुरक्षित ठेवू शकता.

## शौचालयात फोन वापरू नका, अन्यथा होईल 'हा' गंभीर आजार

आपल्याकडे मोबाइलचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. लहानग्यांपासून ते वयोवृद्ध व्यक्ती सतत मोबाइल हाताळताना दिसतात. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत आणि बेडरूमपासून ते शौचालयापर्यंत प्रत्येकाच्या हातात मोबाइल असतो. मोबाइलचा वाढता वापर अतिशय घातक असून, त्याचा वाईट परिणाम आरोग्यावर होतो याचा विचारही केला जात नाही. टाइमपाससाठी शौचालयात मोबाइल नेऊन त्याचा वापर केला जातो. पण हा टाइमपास तुम्हाला खूप आजारी पाडू शकतो...



**डॉक्टरांनी** नुकत्याच केलेल्या निरीक्षणांनुसार, शौचालयात मोबाइलचा वापर करणाऱ्यांना मुळव्याध होण्याची शक्यता दाट जास्त आहे. शौचालयामध्ये मोबाइल नेल्याने बॅक्टेरिया तुमच्या मोबाईलच्या स्क्रीनला लागतात व तेच तुमच्या हातालाही लागतात. परिणामी तुम्हाला मुळव्याधासारख्या गंभीर आजाराला सामोरं जावं लागू शकतं. ब्रिटनमध्ये झालेल्या एका सर्व्हेनुसार, ५७ टक्के लोक शौचालयात मोबाइलचा वापर करतात. तर यातील ८ टक्के लोक हे नियमितपणे शौचालयात बसून मोबाइलचा वापर करतात. शौचालयात मोबाइल वापरणाऱ्यांना मुळव्याधासारख्या अनेक प्रकारच्या आजारांचा सामना करावा लागत असल्याचे डॉक्टारांच्या निदर्शनास आले आहे. ब्रिटनमधील प्रसिद्ध डॉक्टर साराह जर्विस यांनी एका वेबसाइटला दिलेल्या मुलाखतीत म्हटलेय की, शौचालयात जास्त वेळ बसल्यामुळे नसा ताणल्या जातात. परिणामी मुळव्याध होण्याची संभावना अधिक आहे. जितक्यावेळ तुम्ही मोबाइलचा वापर कराल तितक्यावेळ तुम्हाला कमोडवर बसावं लागेल. त्यामुळे गुदमार्गाच्या मांसपेशी ताणल्या जातात, परिणामी मुळव्याधाचा धोका वाढतो. शौचालयात मोबाइल नेल्याने बॅक्टेरिया तुमच्या मोबाइलच्या स्क्रीनला लागतात व तेच तुमच्या हातालाही लागतात. फोनवर बोलल्याने मोबाइलवर चिकटलेले बॅक्टेरिया श्वसनमार्गात प्रवेश करतात. त्यामुळे फ्लू, फंगल इन्फेक्शन यासारखे अनेक गंभीर आजार होण्याची दाट शक्यता असते.

**मूळव्याधाची लक्षणे**

- शौचाच्या ठिकाणी रक्तस्त्राव होणे
- शौचाला आल्यानंतर आग आणि वेदना होणे
- शौचाच्या ठिकाणी खाज येणे
- शौचाच्या वेळेला मांसत भाग बाहेर येणे

**मूळव्याधाचे उपाय...**

आहारात फायबरचं प्रमाण वाढवा, पाणी जास्तीत जास्त सेवन करा, रोज नियमित एक्सरसाइज करा. तसेच टॉयलेटला जाताना फोन बाहेरच ठेवा. शौचालयात फोनचा वापर करू नये.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ्र श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ्र गाळा नं. ४, एन.के.इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ्र श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणा-या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८ . Email ID : policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE – UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At – 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist – Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor – Mr. Dr. Deepak MoreshwarNaik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com